महाराष्ट्र टाइम्स
2/ऑक्टों/2012

रण्यापासून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# कमला कॉलेजमध्ये 'व्यवस्थापन गुरू'

कोल्हापूर टाइम्स टीम
matakolhapur@indiatimes.com

भित्तीपत्रक म्हणजे केवळ कविता, चारोळीसाठीचे व्यासपीठ नव्हे. तर भित्तीपत्रक म्हणजे कॉलेज घडामोडीचे प्रतिबिंब. कॉलेजमध्ये घडणाऱ्या प्रत्येक समारंभाचं, उपक्रमांचे प्रतिबिंब येथे उमटते. कमला कॉलेजमधील कॉमर्स फोरमतर्फे 'व्यवस्थापन गुरू' विषयक वेगळ्या विषयावरील भित्तीत्रकाचे आयोजन केले.

व्यवस्थापन क्षेत्रातील गुरू म्हणून ओळखले जाणारे पीटर डकर, हेनरी फेयॉह, विल गेटस, स्टीव्हन कोव्हे, फ्रेडरिक टेलर, गीता पिरॅमल अशा विविध व्यक्तीमत्वांची ओळख, त्यांचे कार्य, व्यवस्थापन पद्धती याची माहिती भित्तीपत्रकच्या माध्यमातून विद्यार्थिनीपर्यंत पोहचवली. भित्तीपत्तक निर्मितीत कॉलेजच्या मुलींचा सहभाग मोठा. विविध वर्गात शिकणाऱ्या मुलींनी व्यवस्थापन गुरुंची ओळख करुन दिली होती. लेख आणि फोटो यामुळे भित्तीपत्रकाची शोभा वाढली होती. विद्यार्थिनी नम्रता भगवाल, स्वरांजली चौगुले, अश्विनी नवगे, रागिणी मुरवणे, काजल मसुटे, सोनाली पाटील, कोमल रेडेकर, स्वाती चौगुले यांचा भित्तीचित्रण निर्मितीत सहभाग. कॉमर्स विभागाचे प्रा.एस.व्ही. बागल, प्रा.डॉ.वर्षा मैंदर्गी,डॉ.सुमित्रा पवार, प्रा.एच.व्ही.पवार यांनी 'व्यवस्थापन गुरू' भित्तीचित्रण निर्मितीसाठी मुलींना मार्गदर्शन केले.

सकाळ 23 नोव्हें

# धबधबेवाडी ग्रामस्थांचे 'निर्मलग्राम'साठी प्रबोधन

कोल्हापूर : कमला कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दत्तक खेडे मौजे धबधबेवाडी (ता. पन्हाळा) येथे दोन दिवसांचे श्रमशिबिर झाले.

शिवारात स्वयंसेविकांनी 'निर्मलग्राम' विषयावर ग्रामस्थांचे प्रबोधन केले. त्यांनी शुद्ध पाणी, हवा, अन्न यांचे महत्त्व सांगितले. स्वयंसेविकांनी तलावातील केंदाळ ग्रामस्थांच्या सहकार्याने काढून टाकले. प्राथमिक शाळेतील मुलांना स्वच्छतेचे महत्त्वही सांगितले. विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

संयोजन प्रा. एन. एम. शिरोळकर, प्रा. अनिल घस्ते, सरपंच भिकाजी खोपकर व मुख्याध्यापक व्ही. बी. आयरेकर, शिवराज पाटील यांच्यासह गावातील सार्वजनिक मंडळाचे सहकार्य लाभले.

# कमला कॉलेजमध्ये व्याख्यान

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'लोकांचा चलनावर विश्वास असायला हवा. त्यासाठी त्याला सोन्याचे पाठबळ असले पाहिजे.,' असे मत प्रा. पी. ए. गोखले यांनी व्यक्त केले. कमला कॉलेजमध्ये प्राध्यापक प्रबोधिनीच्यावतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. 'खंडीभर रुपये आणि पसाभर डॉलर' हा व्याख्यानाचा विषय होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य क्रांतिकुमार पाटील होते.

'अमेरिकत डॉलरचा पुरवठा कमी होईल असे वाटल्याने जगभरातून अमेरिकन आर्थिक संस्थांनी आपले डॉलर काढून घेऊन अमेरिकत न्यायला सुरुवात केली. त्यामुळे जगभर अमेरिकन डॉलरची मागणी वाढली. त्यामुळे अमेरिकन डॉलर वधारला. त्या तुलनेत जगाती इतर सर्व चलने कोसळली. प्रा. रेखा पंडीत यांनी आभार मानले. प्रा.डॉ. भारती शेळके यांनी व्याख्यानाचे आयोजन केले.